**MHWS080004782024**

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | – | २६.०३.२०२४ |
| नोंदविले तारीख | – | २६.०३.२०२४ |
| निकाल तारीख | – | ०४.०४.२०२६ |
| कालावधी | – | ०२ व. ०० म. ०९ दि. |

**<u>दिवाणी न्यायाधीश क. स्तर, रिसोड यांच्या न्यायालयात</u>**

**<u>(पिठासीन अधिकारी पी. व्ही. सपकाळ)</u>**

**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३९/२०२४</u>** **<u>निशाणी क्र.३८</u>**

०१. **अमोल परशराम जाधव**

वय – ३२ वर्षे, धंदा – शेती

०२. **ज्योती पवन राठोड**

वय – ३६ वर्षे, धंदा – घरकाम

०३. **कु. विधी सतिष जाधव**

वय – ०९ वर्षे, धंदा – शिक्षण

अ.पा.क. अर्जदार क्र.०१

रा.मोहजाबंदी ता. रिसोड जि. वाशिम

ह.मु.रिसोड ता. रिसोड जि. वाशिम

अर्जदार क्र.०२ रा. साखरा ता. सेनगाव जि. हिंगोली ... **<u>अर्जदार</u>**

**विरुध्द**

०१. **संगिता परशराम जाधव**

वय – ५२ वर्षे, कामधंदा – नोकरी

०२. **किरण परशराम जाधव**

वय–२५ वर्षे, कामधंदा–घरकाम

**०३. रोशन परशराम जाधव**

वय–२० वर्षे, कामधंदा–शिक्षण

सर्व रा. मोहजाबंदी ता.रिसोड जि. वाशिम

ह.मु. शिवालय बिल्डींगचे मागे, एकता नगर, रिसोड

ता. रिसोड जि. वाशिम ... **गैरअर्जदार**

**अर्ज – बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ नुसार वारसा प्रमाणपत्र (Heir–ship Certificate) करिता.**

**अर्जदारांतर्फे वकिल श्री. एस.आर. महाजन**

**जाबदेणार तर्फे वकिल श्री. टी.के.शेख**

**न्यायनिर्णय**

**(जाहीर केल्याची दिनांक ०४.०४.२०२६)**

१) अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम – ०८ नुसार वारसा प्रमाणपत्र (Heir–ship Certificate) मिळणेकरीता केला आहे.

**अर्जदार हिचे अर्जातील कथन असे की,**

२) अर्जदार क्र.०१ व ०२ व गैरअर्जदार क्र.०२, ०३ चे वडील नामे परशराम दुधाराम जाधव यांचा विवाह मथुराबाई सोबत झाला असून त्यातून अर्जदार क्र.०१, ०२ सह अर्जदार क्र.०३ चे वडील सतीष हि अपत्ये झाली. मथुराबाई दिनांक १७.११.१९९९ रोजी मयत झाल्या असून सतिष हा दिनांक ३०.१०.२०१७ रोजी मयत झालेला आहे. अर्जदार क्र.०३ ची आई हिने दुसरा विवाह केलेला असून ती पतीसोबत नांदते. मथुराबाईचे पश्चात परशराम यांनी

गैरअर्जदार क्र.०१ सोबत दुसरा विवाह केला असून त्यातून गैरअर्जदार क्र.०२ व ०३ ही अपत्ये झालेली आहेत. परशराम दुधाराम जााधव हे दिनांक १९.११.२०२३ रोजी रिसोड येथे मयत झाले. सदर मयत परशराम, मथुराबाई व सतिष यांची नोंद नगरपरिषद रिसोड येथे केलेली आहे.

३) पुढे अर्जदार यांचे अर्जातील कथनानुसार, परशराम यांचे मृत्यूनंतर अर्जदार क्र.०१ ते ०३ व गैरअर्जदार क्र.०१ ते ०३ हे त्यांचे कायदेशीर वारस असून त्याच्या व्यतिरिक्त मयत परशराम यांना इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामांकरीता मयत परशराम यांचे वारसप्रमाणपत्राची नितांत आवश्यकता आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करुन अर्जदार व गैरअर्जदार यांना मयत परशराम यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यात यावे अशी विनंती केली.

४) सदर अर्जास गैरअर्जदार क्र.०१ व ०३ यांनी हजर होउन नि.क्र.१५ नुसार लेखी जबाब दाखल केला. गैरअर्जदार यांचे म्हणण्यानुसार, त्यांना परशराम यांचे लग्न मथुराबाईशी झाल्याचे त्यातून अर्जदार क्र.०१, ०२ व क्र.०३ चे वडील सतिष ही अपत्ये झाल्याचे, सतिष मथुराबाई व परशराम मयत झाल्याचे, मथुराबाईच्या मृत्यूनंतर परशराम यांनी गैरअर्जदार क्र.०१ सोबत लग्न केल्याचे व त्यातून गैरअर्जदार क्र.०२ व ०३ अपत्ये झाल्याचे मान्य असून अर्जदार क्र.०३ च्या आईने दुसरे लग्न केल्याचे व ती पतीकडे नांदत असल्याचे नाकारले. मयत सतिष याचे पत्नीस याकामी पक्षकार केलेले नसल्याने सदरचा अर्ज चालू शकत नाही.

५) पुढे गैरअर्जदार यांचे म्हणण्यानुसार, कोणते शासकीय अधिकाऱ्यांनी प्रमाणपत्र मागितले व ते कोणत्या कार्यालयात दाखल करायचे याचा उल्लेख अर्जात् केलेला नाही. अर्जदार यांना बँकेतील पैसे काढायचे असतील तर ती रक्कम किती हे

अर्जात नमूद करुन आवश्यक कोर्ट फी देणे आवश्यक आहे. तसेच मालमत्ता बाबत वारसा प्रमाणपत्राकरीता कोर्ट फी देणे गरजेचे असून कोणत्या मालमत्तेबाबत प्रमाणपत्र पाहिजे ते अर्जात् नमूद करावे लागते. शासकीय व निमशासकीय कामांकरीता वारसप्रमाणपत्र काढायचे असल्यास अर्जदारांना सदरचे प्रकरण दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर वाशिम येथे दाखल करावे लागेल. अर्जदार स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आलेले नसून त्यांनी बरीचशी माहिती लपवली आहे.

६) पुढे गैरअर्जदार यांचे म्हणण्यानुसार, गैरअर्जदार क्र.०१ हि शिक्षीका असून तिने तिच्याकडे जमा असलेली रक्कम परशराम हे हयात असतांना त्यांच्या नावे फिक्स डिपॉजीट केले होते. सदरची रक्कम गैरअर्जदार क्र.०१ ची असलयाने ती त्यावर नॉमीनी म्हणून नोंद आहे. सदरची रक्कम गैरअर्जदार क्र.०१ ला मिळावी म्हणून तिने अनंत नागरी पतसंस्था रिसोड येथे अर्ज केला असता अर्जदार क्र.०१ ने हरकत नोंदवली. सदर रकमेशी अर्जदारांचा कोणताही संबंध नाही. सदर रकमेकरीता गैरअर्जदार क्र.०१ ने वाशिम न्यायालयात सक्सेशन सर्टीफिकेटकरीता प्रकरण दाखल केले मात्र काही तांत्रिक अडचणीमुळे ते काढून घेतलेले आहे. असे असता सदरची रक्कम हडप करण्याकरीता अर्जदाराने हरकत नोंदवून सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे तो खारीज करण्यात यावा अशी विनंती केली.

७) गैरअर्जदार क्र.०२ यांनी नि.क्र.१८ वर लेखी जबाब व हरकत नोंदवलेली आहे. त्यांचे कथनानुसार, त्यांना अर्जदार व गैरअर्जदार यांच्यातील नातेसंबंध मान्य असून अर्जदार क्र.०३ चे आईने दुसरा विवाह केल्याचे व ती पतीकडे नांदत असल्याचे नाकारलेले आहे. तिला याकामी वारस म्हणून सामील केले नसल्याने अर्ज चालू शकत नसल्याचे नमूद करुन गैरअर्जदार क्र.०१ व ०३ यांच्याप्रमाणेच इतर तक्रारी नमूद करुन अर्जदारांचा अर्ज खारीज करावा अशी विनंती केली.

८) अर्जदाराचे अर्जातील कथनाच्या अनुषंगाने खालील मुद्दे उपस्थित होत असून त्यावर माझे सकारण निष्कर्षासह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | मयत परशराम दुधाराम जाधव यांचे वारस कोण आहेत अर्जदार क्र.०१ ते ०३ की गैरअर्जदार क्र.०१ ते ०३ ? | अर्जदार क्र.०१ ते ०३ व गैरअर्जदार क्र.०१ ते ०३ . |
| २) | वारसा प्रमाणपत्र मिळण्यास कोण पात्र आहे अर्जदार क्र.०१ ते ०३ की गैरअर्जदार क्र.०१ ते ०३ ? | अर्जदार क्र.०१ ते ०३ व गैरअर्जदार क्र.०१ ते ०३ . |
| २) | अंतिम आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

९) अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाचे कामी अर्जदार क्र.०१ यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.क्र. १६, सा.क्र.०२ प्रियंका रमेश चवहाण हिचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.२८ वर दाखल केलेले आहे. त्यानंतर पुरसीस नि.क्र. ३२ अन्वये त्यांचा पुरावा बंद केलेला आहे. अर्जदार यांचेतर्फे कागदयादी नि.क्र.०४, १३ खालील कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

०१. मयत परशराम दुधाराम जाधव यांचे मूळ मृत्यू प्रमाणपत्र – **नि.क्र.२०**

०२. मयत परशराम दुधाराम जाधव यांचे वारसांचा दाखला–**नि.क्र.२१**

०३. दैनिक पुण्यनगरी वर्तमानपत्रात दिनांक १९.०५.२०२४ रोजी प्रसिध्द केलेली नोटीस –**नि.क्र.२२.**

०४. एम.जे.सी. क्र.६४/२०२४ मधील नि.क्र.०७ व ०१ ची सत्यप्रत – **नि.क्र.२३.**

**१०)** गैरअर्जदार यांनी त्यांचे हरकतीसंदर्भात् गैरअर्जदार क्र.०१ याचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.३४ वर दाखल केलेले असून नि.क्र.३७ वरील पुरसिस नुसार स्वतःचा पुरावा बंद केलेला आहे. गैरअर्जदार यांनी या कामी कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही.

**<u>मुददा क्र.०१ व ०२ करिता–</u>**

**११)** अर्जदार यांचे युक्तीवादातील कथनानुसार, प्रस्तुतचा अर्ज मयत परशराम दुधाराम जाधव यांचे अर्जदार व गैरअर्जदार हे वारस असल्याने वारसाप्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.०१ व ०२ ही मयताची प्रथम पत्नीपासून झालेली अपत्ये असून अर्जदार क्र.०३ ही मयत मुलगा सतिष याची मुलगी आहे तर गैरअर्जदार क्र.०१ ते ०३ हे मयत परशराम यांची दुसरी पत्नी व अपत्ये आहेत. परशराम दुधाराम जाधव हे दिनांक १९.११.२०२३ रोजी मयत झाले असून त्यांना अर्जदार व गैरअर्जदार व्यतिरिक्त अन्य वारस नाहीत. अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामांकरीता वारस प्रमाणपत्रांची आवश्यकता असल्याने अर्ज दाखल केला असून त्यासोबत आवश्यक तो कागदोपत्री पुरावा सादर केलेला आहे. गैरअर्जदार यांनी त्यांचे लेखी जबाबात मयत परशराम यांचेशी अर्जदार व गैरअर्जदार यांचे असलेले नातेसंबंध मान्य केलेले असून अर्जदार क्र.०३ हिची आई प्रियंका हिने तिचे पुराव्यात तिचा दुसरा विवाह झाल्याचे मान्य केलेले असल्याने तिला या कामी वारस म्हणून सामील करण्याची आवश्यकता नाही. सबब अर्ज मंजूर करावा अशी मागणी केली.

**१२)** याकामी गैरअर्जदार यांचे युक्तीवादानुसार अर्जदार यांनी मुळ अर्जात वारस प्रमाणपत्र मागण्याचे कारण नमूद केलेले नाही. केवळ शासकीय निमशासकीय कामाकरीता असे म्हणून त्याबाबत खुलासा दिलेला नाही. अर्जदार क्र.०३ चे आईस पक्षकार केलेले नाही. मयत परशराम यांनी बँकेत जमा केलेले त्यांचे पगाराचे पैसे अर्जदारांना मिळावेत या दुष्ट हेतूने अर्ज दाखल केला असल्याने तो नामंजूर करावा अशी विनंती केली.

**१३)** सदरकामी अर्जदार यांनी त्यांचे तोंडी पुराव्यात अर्जदार क्र.०१ यांना नि.क्र.१६ वर तपासले आहे. पुराव्याचे शपथपत्रात मुळ अर्जातील कथनांचा पुनउच्चार केलेला असून उलटतपासात अर्जदार क्र.०३ हिचे आजी आजोबांकडे मंठा गावी राहत असून तिचे पालन पोषण तेच करत असल्याचे मान्य केलेले आहे. तसेच त्यांचेकडून अर्जदार क्र.०३ चा अ.पा.क. म्हणून अर्जदार क्र.०१ ने परवानगी घेतली नसल्याचे देखील मान्य केलेले आहे. पुढे उलटतपासात अर्जदार क्र.०१ ने त्यांचे वडील परशराम यांनी सन २०१९ साली त्यांना व गैरअर्जदार क्र.०१ व ०३ यांना बक्षीसपत्राने काही मिळकती ताब्यात दिल्या असून त्यांची वहिती जो तो करत असल्याचे कबूल केलेले असून मुलीचे शिक्षणाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असून त्या व्यतिरिक्त इतर उपयोग करणार नसलयाचे मान्य केलेले आहे.

**१४)** अर्जदारातर्फे साक्षीदार म्हणून अर्जदार क्र.०३ ची जनक आई प्रियंका रमेश चव्हाण हिचा पुरावा नि.क्र.२८ वर दाखल केलेला आहे. तिने तिचे सरतपासात असे कथन केले आहे की, मयत सतिष हा परशराम यांचा मुलगा असून तिचा पती होता. त्याचे मृत्यूनंतर तिने रमेश चव्हाण याचेसोबत दुसरा विवाह केलेला असून सध्या अर्जदार क्र.०३ तिचे आजी आजोबांकडे राहते. अर्जदार व गैरअर्जदार हे मयत परशुराम यांचे वारस असल्याचे कथन केलेले आहे. उलटतपासात सदर साक्षीदाराने

सध्या अर्जदार क्र.०३ तिचेसोबत राहत असल्याचे कथन करुन अर्जदार क्र.०१ तिचे पालन पोषण करत असल्याचे नाकारलेले आहे.

**१५)** गैरअर्जदार यांचेतर्फे तोंडी पुराव्यात गैरअर्जदार क्र.०१ यांचा पुरावा नि.क्र.३४ वर दाखल केलेला आहे. त्यांनी लेखी जबाब/हरकतीमध्ये नमूद केलेल्या कथनांचा सरतपासात पुनउच्चार केलेला आहे. उलटतपासात मयत परशराम हे त्यांचे पती असून परशराम यांची प्रथम पत्नी मयत झाल्याचे व अर्जदारासोबत असलेले नातेसंबंध मान्य केलेले आहे. तसेच सर्व अर्जदार व गैरअर्जदार हे मयत परशराम यांचे वारस असल्याचे नमूद केलेले आहे.

**१६)** याकामी अर्जदारातर्फे कागदोपत्री पुराव्यात मयत परशुराम याचे मृत्यू प्रमाणपत्रास नि.क्र.२० वर दाखल केलेले असून परशराम हे दिनांक १९.११.२०२३ रोजी मयत झाल्याचे स्पष्ट होते. तसेच नि.क्र.२१ वरील वारस दाखल्यात अर्जदार क्र.०१ ते ०३ व गैरअर्जदार क्र.०१ ते ०३ या सर्वांची नावे नमूद असून त्याबाबत गैरअर्जदार यांनी आक्षेप नोंदवलेला नाही. याठिकाणी अर्जदार क्र.०१ ने जरी स्वतःला अर्जदार क्र.०३ चा अ.पा.क. म्हणून मूळ अर्जात नमूद केलेले असले तरी त्याचे उलटतपासातील कबूल्यांवरुन व अर्जदार तर्फे सा.क्र.०२ हिचा पुरावा पाहता अर्जदार क्र.०३ चे पालनपोषण अर्जदार १ करत नसल्याचे स्पष्ट होते.

**१७)** याकामी गैरअर्जदार क्र.०१ ते ०३ यांचे हरकतीमधील व गैरअर्जदार क्र.०१ याचे पुराव्यातील तक्रारी पाहता अर्जदार यांनी अर्जदार क्र.०३ ची जनक आई प्रियंका हिला अर्जाचे कामी वारस म्हणून समाविष्ट करणे आवश्यक असल्याचे कथन केलेले आहे. मात्र अर्जदारांचे त्या अनुषंगाने अर्जातील कथन पाहता अर्जदार

क्र.०३ ची जनक आई प्रियंका हिने तिचे पती सतिष मयत झाल्यानंतर रमेश चव्हाण याचेसोबत दुसरा विवाह केल्याचे नमूद केलेले आहे. सदरचे कथन अर्जदार तर्फे साक्षीदार म्हणजेच स्वतः प्रियंका हिने तिचे पुराव्यादवारे मान्य केलेले असल्याने ती याकामी मयत परशराम याची वारस ठरत नाही. त्यामुळे तिला अर्जदार यांनी याकामी आवश्यक पक्षकार म्हणून समाविष्ट करणे गरजेचे असल्याचे गैरअर्जदार यांनी केलेल्या तक्रारीत तथ्य आढळून येत नाही.

१८) गैरअर्जदार यांनी त्यांचे हरकतीमध्ये अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मागण्याचे निश्चीत कारण अथवा नमूद केलेल्या कारणाचा पूर्ण खुलासा मूळ अर्जात् केला नसल्याची तक्रार केलेली आहे. परंतु त्या अनुषंगाने अर्जाचे अवलोकन करता अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता शासकीय व निमशासकीय कामाकरीता गरजेची असल्याचे नमूद केलेले आहे. तसेच अर्जदार क्र.०१ यांनी त्याचे उलटतपासात सदर कारणाचा अर्थ म्हणजे त्याचे मुलीचे शिक्षणाकरीता जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी असा असल्याचे मान्य केलेले असून त्या व्यतिरिक्त वारस प्रमाणपत्राचा इतर उपयोग करणार नसल्याचे मान्य केलेले आहे.

१९) या ठिकाणी **2014 CJ (Bom.) 1526** हा न्यायनिवाडा पाहता, वारस प्रमाणपत्र हे केवळ वारसांचे सोयीकरीता न्यायालयाने दिलेली कायदेशीर वारस असल्याबाबत औपचारिक मान्यता असून सदर प्रमाणपत्रादवारे मयताच्या कोणत्याही स्थावर अथवा जंगम मालमत्तेसंदर्भात कोणताही हक्क व अधिकार प्रमाणपत्रात नमूद केलेल्या वारसांना प्राप्त होत नाही असा स्पष्ट निर्वाळा नमूद केल्याचे दिसून येते. त्यामुळे याकामी अर्जदार क्र.०१ ते ०३ व गैरअर्जदार क्र.०१ ते ०३ हे मयत परशराम दुधाराम जाधव यांचे वारस असल्याचे गृहित धरुन वारस प्रमाणपत्र दिल्यामुळे अर्जदार अथवा गैरअर्जदार यांना मयताचे नावे बँकेत असणाऱ्या

एफ.डी. तील रकमेबाबत, इतर कोणत्याही स्थावर अथवा जंगम मालमत्तेबाबत कोणताही अधिकार प्राप्त होत नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे गैरअर्जदार यांनी त्यांचे हरकतीत/लेखी जबाबात मयताने मयताचे नावे बँकेत असणाऱ्या एफ.डी. तील रकम मिळणेकरीता अर्जदाराने सदरचा अर्ज दाखल केल्याबाबत घेतलेली हरकत या ठिकाणी विचारात घेता येणार नाही अथवा लागू होणार नाही.

२०) सदरकामी अर्जदार क्र.०१ ते ०३ व गैरअर्जदार क्र.०१ ते ०३ हे मयत परशराम दुधाराम जाधव यांचे कायदेशीर वारस आहेत किंवा कसे इतकाच मुददा विचाराधीन घेणे आवश्यक ठरते. वर नमूद केल्याप्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार यांना मयताचे असणारे नातेसंबंध पुर्णपणे मान्य असून अर्जदार क्र.०१ ते ०३ व गैरअर्जदार क्र.०१ ते ०३ यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही वारस असल्याबाबत नि.क्र.२२ वरील दैनिक पुण्यनगरी वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करुन देखील आक्षेप नोंदवण्यात आलेला नाही. याठिकाणी मयताचे वर्ग १ चे वारस कायदयातील तरतुदींअन्वये विचारात घेता अर्जदार क्र.०१,०२ व गैरअर्जदार क्र.०२, ०३ हे मयत परशराम यांची अपत्ये या नात्याने व अर्जदार क्र.०३ ही मयत परशराम यांचा मयत मुलगा सतिष याची मुलगी असल्याने (मयत परशराम यांची नात असल्याने) व गैरअर्जदार क्र.०१ ही मयताची पत्नी या नात्याने मयत परशराम दुधाराम जाधव यांचे पश्चात वारस असल्याने **मुददा क्र.०१ व ०२ चे उत्तर अर्जदार क्र.०१ ते ०३ व गैरअर्जदार क्र.०१ ते ०३** असे नोंदवण्यात येते.

२१) अशा परिस्थितीत, मयत परशराम दुधाराम जाधव याचे मृत्युपश्चात अर्जदार क्र.०१ ते ०३ व गैरअर्जदार क्र.०१ ते ०३ हे कायदेशीर वारस असून वारस प्रमाणपत्र मिळवणेस पात्र असल्याचे निष्कर्षाप्रत येउन मुद्दा क्र. ०३ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

# आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२) अर्जदार क्र.०१ ते ०३ व गैरअर्जदार क्र.०१ ते ०३ यांना मयत परशराम दुधाराम जाधव यांचे कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करणेत येत असून त्यांनी योग्य ते न्यायालयीन शुल्क भरल्यास मुंबई नियंत्रण कायदा, १८२७ चे कलम – ०८ नुसार वारसा प्रमाणपत्र (Heir–ship Certificate) त्यांना देण्यात यावे.

३) अर्जदार क्र.०१ ते ०३ व गैरअर्जदार क्र.०१ ते ०३ यांनी सदर वारस प्रमाणपत्राचा इतर कोणत्याही कारणासाठी गैरवापर करु नये.

४) येणेप्रमाणे सदर अर्ज निकाली काढणेत येत आहे.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करणेत आला.)

PRATAP VISHNU SAPKAL
Digitally signed by PRATAP VISHNU SAPKAL Date: 2026.04.04 16:04:38 +0530

दिनांक –०४.०४.२०२६. (पी. व्ही. सपकाळ)

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, रिसोड

# <u>CERTIFICATE</u>

I affirm that the contents of this PDF file judgment/order are same word for word as per original judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | :- | Shri. P.V. Sapkal<br>Civil Judge Jr. Div., Risod |
| Name of Steno | :- | Harshali A. Uchade (LG) |
| Date of Decision judgment/order | :- | 04.04.2026 |
| Signed by Presiding Officer On | :- | 04.04.2026 |
| judgment/order upload on | :- | 04.04.2026 |